# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक १५/०७/२०२२ (शुक्रवार)**

**(सकाळ)**

---

### नागपूर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत ऑनलाईन पध्दतीने डिजीटल चारीत्र्य पडताळणी प्रमाणपत्र सेवा सुरू केल्याबाबत

पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामिण अंतर्गत नागपुर जिल्हयातील ग्रामिण भागातील लोकांना चारीत्र्य प्रमाणपत्र पडताळणी करीता पोलीस अधीक्षक कार्यालय नागपुर ग्रामिण येथे पायपीट करावी लागत होती परंतु या बाबीची दखल घेवुन मा. श्री विजय कुमार मगर, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामिण यांचे मार्गदर्शनात श्री. अनिल जिट्टावार, पोलीस निरीक्षक, पोलीस नाईक चेतन राउत, प्रभाकर बले, पोलीस शिपाई सत्येंद्र लोखंडे जिल्हा विशेष शाखा यांचे अथक प्रयत्नाने नागपूर ग्रामीण जिल्हयातील चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र सेवा ही आज दि. १५/०७/२०२२ पासुन ऑनलाईन पध्दतीने डिजीटल चारीत्र्य पडताळणी प्रमाणपत्र सेवा सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे जिल्हयातील सुदुर ग्रामीण भागातील जनतेला होणारा आर्थीक, शारीरीक तसेच मानसीक त्रासापासुन मुक्तता मिळाली आहे. यापुढे जिल्हयातील जनतेला चारीत्र्य पडताळणी प्रमाणपत्रा करीता पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागणार नाही.

पोलीस चारीत्र्य पडताळणी प्रमाणपत्र हे ऑनलाईन पध्दतीने सुरू झाल्याने अर्जदार यांना त्यांचे चारीत्र्य पडताळणी प्रमाणपत्र हे जवळच्या सायबर कॅफे वरून किंवा मोबाईलच्या मदतीने काढता येईल याची सर्व चारीत्र्य पडताळणी प्रमाणपत्र अर्जदारांनी नोंद घ्यावी. असे आवाहन करण्यात येत आहे.

### चोरी

**१) पो.स्टे. कन्हान** :- अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील हनुमान नगर कन्हान येथे दिनांक १३/०७/२२ चे १९.३० वा. ते १४/०७/२०२२ चे १०.३० वा. सुमारास फिर्यादी नामे- राजेंद्र मुरलीधर रामेश्वर वय ३६ वर्ष रा. हनुमान नगर कन्हान यांचे घराचे मागील दाराची कुंडी अज्ञात आरोपीने तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने बेडरूमधील लोखंडी आलमारीचे लॉकर तोडुन आलमारीत ठेवलेली ५००/-रू. चे ७० नोटा असा एकुण कि. ३५,०००/-रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार खुषाल रामटेके मो.नं. ८४८५८६१४४२ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. भिवापुर** :- अंतर्गत १५ कि.मी. अंतरावरील मौजा मानोरा शिवार येथे दिनांक ११/०७/२०२२ ते १२/०७/२०२२ सुमारास फिर्यादी नामे- भदंकर रामजी मेश्राम वय ६३ वर्ष रा. मानोरा ता. भिवापुर हल्ली मु. रा. प्लॉट नं ४१ गजानन नगर, वाठोडा ले आउट नागपुर यांच्या मनोरा शिवारातील शेतामध्ये लावलेले सोलर पंप व १५ सोलर प्लेट शासनातर्फे मिळालेले सोलर मोटर पंपचे १५ प्लेटपैकी ०६ प्लेट व मोटार पंप तसेच स्वीच बॉक्स असा एकुण कि. ३०,०००/-रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापुर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार विठ्ठल तित्तीरमारे मो. क्र. ९८२३११२३९९ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत १५ कि.मी. अंतरावरील मौजा चारगाव येथे दिनांक १३/०७/२०२२ चे २२.३० वा. ते १४/०७/२०२२ चे ०६.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– प्रफुल अंकुश मरकोल्हे वय ३४ वर्ष रा. चारगाव यांच्या गोठयात पाणी गळत असल्याने फिर्यादी याने त्याचे दोन बैल गावात राहणारा विठ्ठल बाबुरावजी पुलटकर रा.चारगाव यांचे शेतातील गोठयावर नेवुन बांधले व दिवसभर बैलाचे चारापाणी करुन फिर्यादी व विठ्ठल पुलटकर दोघेही रात्री घरी परत आले. दि. १४/०७/२०२२ रोजी सकाळी ०६.०० वा. विठ्ठल पुलटकर यांनी फिर्यादीच्या घरी जावुन सांगीतले की, 'मी सकाळी शेतात गेलो तेव्हा तुझे माझ्या शेतात बांधलेले दोन पांढऱ्या रंगाचे बैल दिसले नाही' यावरुन फिर्यादी व विठ्ठल पुलटकर यांनी मिळुन आजुबाजुने शोध घेतला परंतु मिळुन आले नाही. अज्ञात आरोपीने फिर्यादीचे पांढऱ्या रंगाचे दोन बैल किंमत ३०,०००/–रु. चे चोरुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**